पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : १२/७ /२०२१

---

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ६**

**(खास सभा)**

**मा.राजू लायगुडे , मा.सौ.अर्चना पाटील, मा.सौ.मनिषाताई कदम, मा.सौ.सुनिता गलांडे , मा.महेश वाबळे, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.वर्षा तापकीर व मा.राहूल भंडारे या स्थायी समितीच्या ८ ( आठ ) मा.सभासदांकडून दिनांक ९/७/२०२१ रोजी लेखी मागणी ( रिक्वीझिशन ) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा गुरूवार, दिनांक १५/७/२०२१ रोजी सकाळी ११=३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.महापौर,मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.**

**सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.**

**विषय क्र–१४४**

संदर्भ – १) मा.उमेश गायकवाड, मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे यांचे दि.९/७/२०२१ चे पत्र.
२) मा.सौ.राजश्री नवले व मा.सौ.वृषाली कामठे यांची दि.०९.०७.२०२१ ची उपसूचना.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.६४,दि.९/७/२०२१

------

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत शासन निर्णय क्र.पीएमसी२०२०/प्र.क्र.३२२/नवि–२२,दि.३०/०६/२०२१ रोजी हद्दीलगतच्या २३ गावांचा समावेश केला आहे. एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २१ अन्वये नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगरपालिकेने या नव्याने समाविष्ट २३ गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

त्यानुसार एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २३ सह ३४ अन्वये दि.३०.०६.२०२१ रोजी पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करणेसाठी इरादा जाहीर करणेस व सदरचा प्रारूप विकास आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २४ अन्वये नगर नियोजन अधिकारी म्हणून पुणे महानगरपालिकेचे नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे यांची नेमणूक करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही त्वरित करावी.

**मा.महापौर यांचे आज्ञेवरुन**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :–१२/७/२०२१

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**